# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि—३/२०१४/ 1558

दिनांक : 20 MAY 2014

प्रति,

सर्व प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित
पदवी व पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था.
(नागपूर विभाग, नागपूर)

**विषय :—** गुणात्मक महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षणात सुधारणा करण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. २३.०४.२०१४ रोजी झालेली बैठक.

**संदर्भ :—** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मु.स. (का.नो.१५१/२०१४)/३६४, दि. ०९ मे २०१४.
२) शासन पत्र क्र. आढावा—२०१४/(४१/१४)/भाग—२/विशि ४, दि.०५ मे २०१४.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांची गुणवत्ता वाढ होणे, पालक/विद्यार्थी/कर्मचारी यांच्या तक्रारीचे निराकरण करणे, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे ई.साठी संस्थांनी खालील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्राचार्य पद अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्तीने नियीमत पध्दतीने भरण्यांत यावे.
२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापकांची नियुक्तीने अध्यापकांची पदे भरणे.
३. प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या पदांचा सक्षम प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या प्रमाणात अध्यापकांची नियुक्ती करणे.
४. रॅगिंग प्रतिबंधक उपायांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करून संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये विश्वासाचे व निर्भय वातावरणाची निर्मिती करणे.
५. महिलांकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महिला तक्रार निवारण कक्षाकडून नोंदविलेले निष्कर्ष तथा शिफारशींची अंमलबजावणी करणे.
६. संस्थेतील अध्यापकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांची शैक्षणिक अर्हता वर्धीत करणे, अल्पकालीन उजळणी वर्ग, पेपर सादरीकरण, विविध परिषदांना उपस्थित राहणे, परिसंवादात भाग घेण्यासाठी अध्यापकांना प्रोत्साहीत करणे.
७. विद्यार्थ्यांना विषयाबाबतचे अद्ययावत ज्ञान अनुभवी व उच्च विद्याविभुषित तज्ञ यांचेकडून करण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचे सहाय्य घेवून जसे Video live / recorded telecast learning method (Virtual learning Sysstem) इत्यादी पध्दतीचा अवलंब करून उच्च विद्याविभुषित तंज्ञा मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.
८. गरीब व होतकून विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक कंर्ज (विना—तारण) मिळण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सहाय्य करणे.

९. संस्थांनी अभ्यासक्रमनिहाय मंजूर क्षमता, झालेले प्रवेश, प्लेसमेंट, तक्रार निवारण कक्ष, महिला तक्रार निवारण कक्ष, अँटी कॉपिटेशन अॅक्ट, रॅगिंग इ.बाबतची अद्ययावत माहिती त्यांच्या संकेतस्थळी प्रसिध्द करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे.

१०. संस्थेतील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल द्वारे संस्था व स्थानिक तसेच संबंधित उद्योगधंदे यामध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना राजगार उपलब्ध करून देण्यास मदत करणे.

११. संस्थांनी एनबीएचे नामांकन करून घेणे.

१२. संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता मिळविण्यासाठी प्रयत्न करावे.

१३. पेटंट व इन्होवेशन सेलची स्थापना करणे.

तरी वरील मुद्यांच्या अनुषंगाने संस्थांनी Action Plan त्वरीत तयार करून या कार्यालयास दिनांक **३१.०५.२०१४** पर्यंत सादर करावा व त्यानुसार कार्यवाही करून अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

मा. मुख्य सचिव यांनी ही बाब अतिशय गांभिर्यानें घेतलेली असल्याने याबाबत कुठलीही दिरंगाई अथवा टाळाटाळ करण्यांत येऊ नये. तसेच याबाबत दिरंगाई करणा—या संस्थांवर शासन स्तरावर कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**(गु[illegible]राव ठाकरे)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

प्रत : १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई—३२ यांना मानार्थ सादर.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २) यांना मानार्थ सादर.